# L

**Label** *n.* खूणचिठ्ठी (स्त्री.)
*v.t.* खूणचिठ्ठी लावणे

**Labial** *adj.* ओष्ठ्य

**Laboratory** *n.* प्रयोगशाळा (स्त्री.)

**Laborious** *adj.* श्रमकारक

**Laboriously** *adv.* परिश्रमपूर्वक

**Labour** *n.* १ श्रम (पु. अ. व.) २ (workers collectively) कामगार (पु. अ. व.) ३ (the pangs and efforts of childbirth) प्रसूतिवेदना (स्त्री. अ. व.)
*v.i.* १ (to perform labour) श्रम करणे २ (to be oppressed with difficulties) अडचणी सोसणे ३ (to suffer pangs of childbirth) प्रसूतिवेदना लागणे

**Labour arbitration** कामगार लवाद (पु.)

**Labour bureau** कामगार केंद्र (न.)

**Labour contractor** कामगार कंत्राटदार (पु.)

**Labour Court** कामगार न्यायालय (न.)

**Labour economics** कामगार अर्थशास्त्र (न.)

**Labourer** *n.* कामगार (पु.), मजूर (पु.), श्रमिक (पु.)

**Labouring class** श्रमिकवर्ग (पु.)

**Labourite** *n.* १ (an advocate or adherent of labourism) श्रमवादी (सा.) २ (a member of Labour Party) मजूरपक्षीय (सा.)

**Labour market** कामगार बाजार (पु.)

**Labour monopoly** श्रमिक एकाधिकार (पु.), कामगार मक्तेदारी (स्त्री.)

**Labour Party** मजूर पक्ष (पु.)

**Labour room** प्रसूतिकक्ष (पु.)

**Labour union** कामगार संघ (पु.), श्रमिक संघ (पु.)

**Labour welfare** कामगार कल्याण (न.)

**Labyrinth** *n.* १ चक्रव्यूह (पु.) २ *Zool.* गहन (न.)

**Lac** *n.* (a dark-red transparent resin) लाख (स्त्री.)

**Lac** = **Lakh**

**Lace** *v.t.* १ (to fasten with a lace) नाडीने बांधणे २ (to adorn with narrow strips, to border with lace) नक्षीपट्टी लावणे
*n.* १ नाडी (स्त्री.), बंद (पु.) २ नक्षीपट्टी (स्त्री.)

**Laches** *n.* १ *Law* टाळाटाळ (स्त्री.) २ दिरंगाई (स्त्री.)

**Lack** *n.* अभाव (पु.), उणीव (स्त्री.)
*v.t. & i.* अभाव असणे, उणीव असणे

**Lacker** = **Lacquer**

**Lack-lustre** *adj.* निस्तेज

**Lacquer** *n.* लाखरोगण (न.)
*v.t.* लाखरोगण लावणे

**Lactation** *n.* १ अंगावर पाजणे (न.), स्तनपान (न.) २ पान्हा (पु.), दुग्धस्रवण (न.) ३ दूध येण्याचा काळ (पु.)

**Lacteal** *adj.* १ (pertaining to milk) दुधासंबंधी २ (resembling milk) दुग्धसदृश, दुधासारखा

**Lactometer** *n.* दुग्धतामापी (पु.)

**Lactose** *n.* दुग्धशर्करा (स्त्री.) लॅक्टोज (न.)

**Lacuna** *n.* उणीव (स्त्री.)

**Lad** *n.* छोकरा (पु.)

**Ladder** *n.* शिडी (स्त्री.)

**Lade** *v.t.* (ओझे इत्यादि) लादणे, भरणे

**Ladies' common-room** १ विद्यार्थिनी कक्ष (पु.) २ महिला कक्ष (पु.)

**Lading** *n.* भरण (न.)

**Lady** *n.* महिला (स्त्री.)

**Lady instructor** निदेशिका (स्त्री.)

**Lady organiser** महिला संघटक (स्त्री.)

**Lady principal** प्राचार्या (स्त्री.)

**Lady superintendent** अधीक्षिका (स्त्री.)

**Lady teacher** शिक्षिका (स्त्री.)

**Lady worker** कार्यकर्ती (स्त्री.)

**Lag** *n.* रेंगाळणी (स्त्री.)

**Lag behind** पाठीमागे पडणे, मागे पडणे

**Lagoon** *n.* कच्छसर (न.)

**Laid down** निर्धारित, घालून दिलेला

**Lair** *n.* श्वापदस्थान (न.), गुहा (स्त्री.)

**Laissez-faire** १ निरंकुश अर्थव्यवहार (पु.) २ निरंकुशता (स्त्री.)

**Laissez-faire policy** निरंकुशतेचे धोरण (न.)

**Laity** *n.* १ गृहस्थवर्ग (पु.) २ (laymen) सामान्य जन (पु. अ. व.)

**Lake** *n.* सरोवर (न.)

**Lakh** *n.* (the number 100,000) लाख (पु.), लक्ष (पु.)

**Lame** *adj.* लंगडा, पांगळा

**Lame duck** १ *Stock-exch.* (a person unable to fulfil his engagements) कर्जबुडव्या (पु.) २ *Pol.* (an office-holder as a senator or congressman, who has failed of re-election) पडेल उमेदवार (सा.)

**Lame excuse** लंगडी सबब (स्त्री.)

**Lament** *v.t. & i.* विलाप करणे, शोक करणे

**Lamentation** *n.* विलाप (पु.), शोक (पु.)

**Lamp** *n.* दिवा (पु.)

**Lampblack** *n.* काजळी (स्त्री.)

**Lance** *n.* भाला (पु.)
  *v.t.* (to pierce with a lance) भाला मारणे

**Lancer** *n.* भालाईत (पु.)

**Land** *n.* भू (स्त्री.), भूमि (स्त्री.), जमीन (स्त्री.)
  *v.t. & i.* उतरवणे, उतरणे
  Barren land नापीक जमीन, बरड जमीन
  Fertile land सुपीक जमीन
  Marshy land दलदलीची जमीन
  Waste land पडीत जमीन

**Land acquisition** भूमिसंपादन (न.)

**Landed** *adj.* १ जमिनीवर उतरलेला २ *Law* (consisting in or derived from land or real estate) स्थावर

**Landed estate** भू-संपदा (स्त्री.)

**Landed interest** भू-हितसंबंध (पु.)

**Landed property** *Law* स्थावर संपत्ति (स्त्री.)

**Landed security** भू-प्रतिभूति (स्त्री.)

**Land-force** *n.* स्थल सेना (स्त्री.)

**Land-holder** *n.* भूधारक (सा.)

**Land-holding** *n.* भू-धारण (न.)

**Land improvement** जमीन सुधार (पु.)

**Landing** *n.* १ उतरवणे (न.), उतरणे (न.) २ (जिन्याचा) टप्पा (पु.)

**Landing charges** उतरणावळ (स्त्री.)

**Landing order** उतरवण्याचा आदेश (पु.)

**Landing-place** *n.* उतरवण्याची जागा (स्त्री.)

**Land-jobber** *n.* (a speculator in landed property) जमीन सटोडिया (पु.)

**Landlady** *n.* १ (the mistress of an inn, boarding house or lodging house) खाणावळीची मालकीण (स्त्री.) २ घर-मालकीण (स्त्री.)

**Landless** *adj.* भूमिहीन

**Land-locked** *adj.* भूवेष्टित

**Landlord** *n.* *Law* १ (of lands) जमीन-मालक (पु.) २ (of buildings, houses) घरमालक (पु.) ३ क्षेत्रस्वामी (पु.)

**Landlordism** *n.* क्षेत्रस्वामित्व पद्धति (स्त्री.)

**Landmark** *n.* १ सीमाचिन्ह (न.) २ (any event, characteristic, or modification, which marks a turning point or a stage as, a landmark in history) इतिहासकारी घटना (स्त्री.), अति-महत्त्वाची घटना (स्त्री.)

**Land-measure** *n.* भू-माप (न.)

**Land mortgage** भू-तारण (न.)

**Land mortgage bank** भू-तारण बंक (स्त्री.)

**Land-owner = Land proprietor** *n.* भू-स्वामी (पु.)

**Land records** भू-अभिलेख (पु. अ. व.)

**Land reforms** जमीन सुधारणा (स्त्री.अ.व.)

**Land revenue** जमीन महसूल (पु.)

**Land route** खुष्कीचा मार्ग (पु.)

**Landscape** *n* १ निसर्गचित्र (न.), निसर्गदृश्य (न.) २ भूदृश्य (न.)

**Land tenure** भू-धारणा (स्त्री.)

**Land tenure abolition** भू-धारणा निरास (पु.)

**Land utilisation** भूमि उपयोग (पु.)

**Land utilisation survey** भूमि उपयोग सर्वेक्षण (न.)

**Land valuation** भू-मूल्यांकन (न.)

**Lane** *n.* गल्ली (स्त्री.)

**Language** *n.* भाषा (स्त्री.)

**Language pay** भाषा वेतन (न.)

**Lantern** *n.* कंदील (पु.)

**Lantern-slide** *n.* दीपचित्र (न.)

**Lap** *n.* १ मांडी (स्त्री.) २ टप्पा (पु.)

**Lapse** *v.i.* व्यपगत होणे
*n.* चूक (स्त्री.), स्खलित (न.)

**Lapsed** *adj.* व्यपगत

**Lapsed legacy** व्यपगत मृत्युपत्रित संपत्ति (स्त्री.)

**Lapsed policy** व्यपगत विमापत्र (न.)

**Larceny** *n.* चोरी (स्त्री.) *cf.* Theft

**Large** *adj.* १ मोठा २ बृहत ३ (in comb.—generous, magnanimous) उदार (as in : large-minded उदार मनाचा)

**Large-handed** *adj.* सढळ हाताचा

**Large-hearted** *adj.* मोठ्या मनाचा

**Largely** *adv.* बऱ्याच अंशी

**Largeness** *n.* मोठेपणा (पु.)

**Large-scale** *adj.* बृहत्परिमाण–, मोठ्या प्रमाणावरील

**Large-scale industry** बृहत उद्योग (पु.)

**Large-scale trials** बृहत्परिमाण प्रयोग (पु. अ. व.)

**Larva** *n.* कोशातील किडा (पु.), अळी (स्त्री.)

**Larynx** *n.* कंठ (पु.)

**Lascivious** *adj.* १ (tending to lewd emotions) कामुक २ कामोद्दीपक

**Lash** *n.* फटकारा (पु.)
*v.t. & i.* फटकावणे

**Laskar** *n.* कामकरी (सा.)

**Lass** *n.* छोकरी (स्त्री.)

**Lassitude** *n.* १ सुस्ती (स्त्री.) २ ग्लानि (स्त्री.)

**Last** *adj.* १ अंतिम २ मागील, गत
*v.i.* टिकणे

**Last but one** उपांत्य

**Lasting** *adj.* चिरस्थायी, टिकाऊ

**Lastingness** *n.* टिकाऊपणा (पु.)

**Lastly** *adv.* अंततः, शेवटी, सरतेशेवटी

**Last pay certificate** अंतिम वेतन प्रमाणपत्र (न.)

**Last preceding** लगत पूर्ववर्ती, निकटपूर्वी

*Lata culpa, Law* (gross fault) घोर दोष (पु.)

**Latch** *n.* (a light door-lock, opened from without by a key) पोटकुलूप (न.)

**Latchkey** *n.* पोटकुलुपाची किल्ली (स्त्री.)

**Late** *adj.* १ समयोत्तर २ (out of office) भूतपूर्व ३ (deceased, departed) दिवंगत
*adv.* समयोत्तर, उशीरा

**Late fee** विलंब शुल्क (न.)

**Lately** *adv.* अलिकडे

**Late news** समयोत्तर वृत्त (न.), उशीरा आलेले वृत्त (न.)

**Late notification** समयोत्त अधिसूचना (स्त्री.)

**Latent** *adj.* १ सुप्त २ अप्रकट

**Latent defect** अप्रकट दोष (पु.)

**Latent heat** *Phys.* अप्रकट ऊष्मा (पु.)

**Latent quality** सुप्त गुण (पु.)

**Later** *adj.* पुढचा, नंतरचा *cf.* subsequent

**Lateral** *adj.* बाजूचा, पार्श्विक
*n. Irrig.* (a side ditch or conduit) पार्श्वनाली (स्त्री.)

**Lateral line** पार्श्वरेषा (स्त्री.)

**Laterally** *adv.* बाजूकडून

**Latest** *adj.* नवीनतम

**Late turn** उशीर पाळी (स्त्री.)

**Lathe** *n.* लेथ (पु.)

**Latitude** *n.* १ *Geog.* अक्षांश (पु.) २ (scope, allowance) मोकळीक (स्त्री.)

**Latrine** *n.* शौचकूप (पु.)

**Latter** *adj.* १ नंतरचा २ (second mentioned of two) दुसरा

**Lattice** *n.* जाळी (स्त्री.), जालक (न.)
*v.t.* (to furnish with lattice) जाळी बसवणे

**Laud** *v.t.* स्तुती करणे
*n.* स्तवन (न.), स्तोत्र (न.)

**Laudable** *adj.* स्तवनीय

**Laugh** *v.i.* हसणे
(*to laugh at* उपहास करणे)

**Laughable** *adj.* हास्यास्पद, हास्यजनक

**Laughing-gas** *n.* हसवणारा वायु (पु.)

**Laughter** *n.* हास्य (न.)

**Launch** *n.* १ (a pleasure craft) नौका (स्त्री.) २ जलावतरण (न.)
*v.t.* १ जलावतरण करणे २ (to start, initiate) आरंभ करणे, उपक्रम करणे

**Launder** *v.t.* धुवून इस्त्री करणे

**Launderer** = Laundryman

**Laundering** *n.* परटाचा धंदा (पु.), धोबीकाम (न.)

**Laundress** *n.* धोबीण (स्त्री.)

**Laundry** *n.* धुलाईघर (न.)

**Laundryman** *n.* धोबी (पु.)

**Laurel** *n.* (esp. in *pl.*) मानमुकुट (पु.)

**Lava** *n.* ज्वालारस (पु.)

**Lavatory** *n.* शौचालय (न.)

**Lavish** *adj.* १ मुक्तहस्त २ अमाप
*v.t.* उधळपट्टी करणे

**Lavishly** *adv.* उधळपट्टीने, उधळेपणाने

**Law** *n.* १ विधि (पु.), कायदा (पु.) *cf.* Act २ (a statement or formula expressing the constant order of certain phenomena) सिद्धांत (पु.) ३ (a rule or code in any department of action, as morality, art, etc.) नियम (पु.)

Civil law दिवाणी विधि, दिवाणी कायदा

Constitutional law संविधानीय विधि

Conventional law संकेतमान्य विधि

Criminal law फौजदारी विधि, फौजदारी कायदा

Local law स्थानिक विधि

Martial law लष्करी कायदा

Municipal law नगरपालिका विधि, नगरपालिकेचा कायदा

Statutory law संविधिमान्य विधि

**Law-abiding** *adj.* विधिचारी

**Law and order** कायदा व सुव्यवस्था

**Law-book** *n.* विधि ग्रंथ (पु.)

**Law-breaker** *n.* कायदा मोडणारा (पु.)

**Law charges** वादव्यय (पु.)

**Law college** विधि महाविद्यालय (न.)

**Lawful** *adj. Law* विधिसंमत, कायदेशीर *cf.* Legitimate

**Lawful custody** वैध अभिरक्षा (स्त्री.)

**Lawful guardian** विधिसंमत पालक (सा.)

**Lawfulness** *n.* विधिपूर्णता (स्त्री.), कायदेशीरपणा (पु.)

**Lawful possession** वैध कब्जा (पु.), कायदेशीर कब्जा (पु.)

**Law journal** विधि कालिक (न.)

**Lawless** *adj.* १ विधिशून्य २ विधि-अवज्ञाकारी

**Lawlessness** *n.* १ विधिशून्यता (स्त्री.) २ बेबंदशाही (स्त्री.)

**Law-maker** *n.* विधिनिर्माता (पु.)

**Lawn** *n.* १ हिरवळ (स्त्री.) २ लोनचे कापड (न.)

**Law of nations** आंतरराष्ट्रीय विधि (पु.)

**Law reports** विधि प्रतिवृत्त (न.)

**Lawsuit** *n.* वाद (पु.)

**Lawyer** *n.* विधिज्ञ (सा.)
*cf.* Advocate अधिवक्ता
Attorney न्यायप्रतिनिधि
Barrister बॅरिस्टर
Counsel समुपदेशी
Pleader वकील
Solicitor सॉलिसिटर

**Lax** *adj.* ढिला

**Laxative** *adj.* सारक

**Laxity** *n.* ढिलेपणा (पु.)

**Lay** *v.t.* ठेवणे, मांडणे

**Lay a foundation-stone** कोनशिला बसवणे, शिलान्यास करणे

**Lay arms** (to surrender) शरणागतीने शस्त्रे खाली ठेवणे

**Lay claim to** —वर दावा सांगणे

**Lay-day** *n.* (day allowed for loading and unloading ships) भरणउतरवण दिवस (पु.)

**Lay down** १ नमूद करणे २ (as conditions, etc.) घालून देणे, निर्धारित करून देणे ३ *Agric.* (same as 'ley') पेरणे

**Layer** *n.* १ स्तर (पु.), थर (पु.) २ अंडी घालणारी (स्त्री.)

**Lay hands on** १ (to seize) हस्तगत करणे २ (to do violence to) हात टाकणे

**Layman** *n.* १ सामान्य व्यक्ति (स्त्री.) २ अनभिज्ञ व्यक्ति (स्त्री.)

**Lay-off** *n.* अपरिहार्य कामबंदी (स्त्री.)

**Lay on the table** (as, on the table of Assembly or Parliament) पटलावर ठेवणे

**Lay-out** *n.* १ मांडणी (स्त्री.) २ रेखांकन (न.) *cf.* Map

**Lay out** (to spend) —कडे खर्च करणे

**Laziness** *n.* आळस (पु.)

**Lazy** *adj.* आळशी

**Lead** *v.t. & i.* १ वाट दाखवणे २ बरोबर नेणे ३ पुढाकार घेणे ४ पुढे असणे
*n.* १ नेतृत्व (न.) २ पुढाकार (पु.) ३ (amount by which one is ahead) आधिक्य (न.) ४ शिसे (न.)

**Lead a witness** *Law* (to put leading questions to a witness) साक्षीदाराला सूचक प्रश्न विचारणे

**Lead caster** शिसपट्टी ओतारी (पु.)

**Leader** *n.* १ (of a party, etc.) नेता (पु.) प्रमुख (सा.) २ *Journalism* (leading editorial article) अग्रलेख (पु.)

**Leaderette** *n.* (a short editorial paragraph in a newspaper) छोटा अग्रलेख (पु.)

**Leader of the House** सभागृह नेता (पु.)

**Leader of the Opposition** विरोधीपक्ष नेता (पु.)

**Leadership** *n.* नेतृत्व (न.)

**Leading** *adj.* १ प्रमुख २ अग्रेसर, आघाडी-वरचा

**Leading case** *Law* (a case, the decision in which has come to be regarded as settling the law of the question involved, so that it is made a precedent for other like or analogous cases) प्रमाणभूत वाद (पु.)

**Leading driver** अग्रचालक (पु.)

**Leading question** *Law* सूचक प्रश्न (पु.)

**Lead-pencil** *n.* शिसपेन्सिल (स्त्री.)

**Lead to complications** गुंतागुंत होणे

**Leaf** *n.* पान (न.), पर्ण (न.)

**Leafless** *adj.* *Forestry* पर्णहीन

**Leaflet** *n.* पर्णक (न.) *cf.* Bulletin

**League** *n.* १ संघ (पु.) २ संगनमत (न.) ३ जूट (स्त्री.) *cf.* Alliance ४ तीन मैलांचे अंतर (न.)

**League of Nations** राष्ट्रसंघ (पु.)

**Leak** *v.i.* १ गळणे २ (as, information) फुटणे

**Leakage** *n.* १ गळती (स्त्री.) २ फुटणे (न.)

**Leaking** = Leaky

**Leak-proof** *adj.* गळतीबंद, गळतीरोधक

**Leaky** *adj.* गळणारा, गळता

**Lean** *v.t. & i.* झुकणे, वाकणे
*adj.* कृश

**Leaning** *n.* झोक (पु.), झुकाव (पु.)

**Leanness** *n.* कृशता (स्त्री.)

**Leap** *v.i.* उडी मारणे
*n.* उडी (स्त्री.)

**Leap-day** *n.* अधिदिन (पु.)

**Leap-year** *n.* अधिदिन वर्ष (न.)

**Learn** *v.t. & i.* शिकणे

**Learned** *adj.* १ विद्वान २ विद्वत्ताप्रचुर

**Learnedness** *n.* विद्वत्ता (स्त्री.)

**Learner** *n.* शिकाऊ (व्यक्ति वगैरे), नवशिका (पु.)

**Learning** *n.* १ विद्या (स्त्री.) २ विद्वत्ता (स्त्री.)

**Leasable** *adj.* पट्टदेय, पट्ट्याने देण्याजोगा

**Lease** *v.t.* *Law* १ भाडेपट्ट्याने देणे २ पट्ट्याने देणे
*n.* *Law* १ (as, of buildings, houses, etc.) भाडेपट्टा (पु.) २ (as, of lands) पट्टा (पु.) ३ भाडेपट्ट्याची मुदत (स्त्री.) ४ पट्ट्याची मुदत (स्त्री.)

**Leased area** पट्ट्याने दिलेले क्षेत्र (न.)

**Lease deed** १ भाडेपट्टा विलेख (पु.) २ पट्टालेख (पु.)

**Leasehold** *n.* *Law* (a tenure by lease) पट्टेदारी (स्त्री.) *cf.* Copyhold
*adj.* पट्ट्याने घेतलेला

**Leaseholder** *n.* *Law* पट्टाधारक (सा.)

**Leasehold system** *Law* पट्टेदारी पद्धति (स्त्री.)

**Leasehold value** *Law* पट्टामूल्य (न.)

**Lease-lend** *n.* उधारपट्टा (पु.)

**Least** *adj.* १ कमीत कमी, किमान २ लघुतम

**Leather** *n.* चर्म (न.), चामडे (न.)

**Leather goods** चामड्याच्या वस्तू (स्त्री. अ. व.)

**Leathern** *adj.* चामड्याचा

**Leather work** चर्मकाम (न.)

**Leather working school** चर्म विद्यालय (न.)

**Leave** *v.t. & i.* १ सोडणे, सोडून देणे २ सोडून जाणे
*n.* १ परवानगी (स्त्री.) २ रजा (स्त्री.)
**Casual leave** नैमित्तिक रजा
**Commuted leave** परिवर्तित रजा
**Compensatory leave** पूरक रजा
**Converted leave** रूपांतरित रजा
**Earned leave** अर्जित रजा
**Hospital leave** रुग्णालयीन रजा
**Maternity leave** प्रसूति रजा
**Medical leave** वैद्यकीय रजा
**Quarantine leave** दूरस्थापन रजा
**Sick leave** रुग्णता रजा

[*contd.*

**Leave** —*contd.*

Special disability leave विशेष नि:समर्थता रजा

Special leave विशेष रजा

Study leave अध्ययन रजा

**Leave account** रजेचा लेखा (पु.), रजाखाते (न.)

**Leave admissible** अनुज्ञेय रजा (स्त्री.)

**Leave allowance** रजा भत्ता (पु.)

**Leave and licence** संमती नि परवानगी

**Leave at credit** जमेस असलेली रजा (स्त्री.)

**Leave due** देय रजा (स्त्री.)

**Leave not due** अनर्जित रजा (स्त्री.) (*leave not due* रजा शिल्लक नाही)

**Leave of absence** अनुपस्थितीची परवानगी (स्त्री.)

**Leave on average pay** सरासरी वेतनावरील रजा (स्त्री.)

**Leave on half-average pay** अर्ध सरासरी वेतनावरील रजा (स्त्री.)

**Leave on medical certificate** वैद्यकीय प्रमाणपत्राधारे रजा (स्त्री.)

**Leave on medical grounds** वैद्यकीय कारणांसाठी रजा (स्त्री.)

**Leave on private affairs** खाजगी कामाकरता रजा (स्त्री.)

**Leave on quarter-average salary** चतुर्थांश सरासरी वेतनावरील रजा (स्त्री.)

**Leave out of India** भारताबाहेर जाण्यासाठी रजा (स्त्री.)

**Leave preparatory to retirement** निवृत्तिपूर्व रजा (स्त्री.)

**Leave reservist** रजाराखीव (सा.)

**Leave salary** रजा वेतन (न.)

**Leave travel concession** रजामुदती प्रवास सवलत (स्त्री.)

**Leave vacancy** रजामुदती रिक्त पद (न.)

**Leave without allowance** बिनभत्ता रजा (स्त्री.)

**Leave without pay** अवैतनिक रजा (स्त्री.), बिनपगारी रजा (स्त्री.)

**Leave with pay** वेतनी रजा (स्त्री.), पगारी रजा (स्त्री.)

**Lecture** *n.* व्याख्यान (न.)

*v.t. & i.* व्याख्यान देणे

**Lecturer** *n.* अधिव्याख्याता (सा.)

**Lectureship** *n.* अधिव्याख्याता पद (न.)

**Ledger** *n.* खातेवही (स्त्री.), खतावणी (स्त्री.)

Account ledger लेखा खातेवही

Balance ledger शिल्लक खातेवही

Card ledger खातेपत्रक

Cost ledger परिव्यय खातेवही

Customer's ledger ग्राहक खातेवही

Debtor's ledger ऋणको खातेवही

General ledger सर्वसाधारण खातेवही, सामान्य खातेवही

Stock ledger संग्रह खातेवही

**Ledger book** खातेवही (स्त्री.), खतावणी (स्त्री.)

**Ledger entry** खातेवही नोंद (स्त्री.)

**Ledger folio** खातेवही पृष्ठ (न.)

**Lee** *n.* वातसुरक्षित स्थान (न.)

**Leech** *n.* जळू (स्त्री.)

*v.t.* जळवा लावणे

**Leeward** *adj. & adv.* वाताभिमुख

**Leeway** *n.* अडचणीतून मार्ग काढणे (न.)

**Left** *adj.* डावा

**Left-handed** *adj.* डावखुरा

**Left-handedness** *n.* डावखुरेपणा (पु.)

**Leftist** *n.* डावा (पु.)

**Left lobby** डावा सभाकक्ष (पु.)

**Left out** सोडलेला, सोडून दिलेला

**Leftward** *adv.* डावीकडे
*adj.* डावीकडचा

**Leg** *n.* तंगडी (स्त्री.), पाय (पु.)

**Legacy** *n. Law* १ (that which is left to one by will) मृत्युपत्रित संपत्ति (स्त्री.) २ (a bequest, or gift of goods and chattels by will or testament) मृत्युपत्रितदान (न.)
*cf.* Bequest मृत्युपत्रित देणगी
Heritage वंशार्जित संपत्ति
Inheritance वारसाप्राप्त संपत्ति
३ *Fig.* वारसा (पु.), रिक्थ (न.)

**Legacy duty** मृत्युपत्रित संपत्ति कर (पु.)

**Legacy residuary** अवशिष्ट मृत्युपत्रित संपत्ति (स्त्री.)

**Legal** *adj. Law* १ वैध *cf.* Legitimate
२ विधि–

**Legal adviser** विधि सल्लागार (सा.)

**Legal concept** विधि कल्पना (स्त्री.)

**Legalisation** *n.* वैधीकरण (न.)

**Legalise** *v.t.* वैध करणे

**Legality** *n. Law* वैधता (स्त्री.)

**Legal keeper** वैध रक्षक (पु.)

**Legally** *adv.* वैध रीतीने, विधितः

**Legally bound** विधिबद्ध

**Legal practitioner** विधि व्यवसायी (सा.)

**Legal proceedings** न्यायालयीन कार्यवाही (स्त्री.)

**Legal process** वैध आदेशिका (स्त्री.)

**Legal remembrancer** विधि परामर्शी (सा.)

**Legal right** वैध अधिकार (पु.)

**Legal tender** वैध चलन (न.)

**Legal tender money** वैध चलन मुद्रा (स्त्री.)

**Legal wing** विधि शाखा (स्त्री.)

**Legated** *adj.* मृत्युपत्रित *cf.* Hereditary

**Legatee** *n. Law* मृत्युपत्रितदानग्राही (सा.)

**Legation** *n.* १ वकिलात (स्त्री.) २ वकिलात कर्मचारीवृंद (पु.)

**Legator** *n. Law* मृत्युपत्रितदानकारी (सा.)

**Legend** *n.* दंतकथा (स्त्री.)

**Legendary** *adj.* दंतकथागत

**Legibility** *n.* सुवाच्यता (स्त्री.)

**Legible** *adj.* सुवाच्य, वाचण्यास सोपा

**Legion** *n.* १ सेनादळ (न.) २ प्रचंड संख्या (स्त्री.)

**Legislate** *v.i.* विधिविधानित करणे, विधिबद्ध करणे

**Legislation** *n.* विधिविधान (न.)

**Legislative** *adj.* वैधानिक
*n.* (the legislative department of the Government) विधि अंग (न.)

**Legislative Act** वैधानिक अधिनियम (पु.)

**Legislative affairs** विधान कार्य (न.)

**Legislative Assembly** विधान सभा (स्त्री.)

**Legislative Assembly question** विधान सभा प्रश्न (पु.)

**Legislative business** वैधानिक कामकाज (न.)

**Legislative Council** विधान परिषद (स्त्री.)

**Legislator** *n.* विधिकार (पु.)

**Legislature** *n.* विधानमंडळ (न.)

**Legitimacy** *n. Law* १ औरसता (स्त्री.) २ वैधिकता (स्त्री.), कायदेशीरपणा (पु.) ३ तर्कसंगति (स्त्री.) ४ न्याय्यता (स्त्री.)

**Legitimate** *adj. Law* १ औरस २ वैधिक, कायदेशीर

*cf.* Lawful विधिसंमत, कायदेशीर
Legal वैध
Permissible अनुज्ञेय

३ तर्कसंगत ४ न्याय्य

**Legitimation** *n.* १ औरस ठरवणे (न.) २ वैध ठरवणे (न.), कायदेशीर ठरवणे (न.)

**Legitimatise = Legitimise** *v.t.* १ औरस ठरवणे २ वैध ठरवणे, कायदेशीर ठरवणे

**Legume** *n.* १ द्विदल धान्य (न.) २ द्विदल रोप (न.)

**Leguminous** *adj.* द्विदल जातीचा

**Leisure** *n.* फुरसत (स्त्री.)

**Leisurely** *adv.* फुरसतीने

**Lend** *v.t.* उसने देणे

**Lendable** *adj.* उसने देण्याजोगा

**Lender** *n.* (money-lender) सावकार (पु.)

**Lending** *n.* १ उसने देणे (न.) २ (money-lending) सावकारी (स्त्री.)

**Length** *n.* लांबी (स्त्री.)

**Lengthen** *v.t.* लांब करणे

**Lengthiness** *n.* लांबण (स्त्री.), लांबलचकपणा (पु.)

**Length of service** *Admin.* सेवाकाल (पु.)

**Lengthwise** *adv.* लांबीच्या बाजूने

**Leniency** *n.* सौम्यता (स्त्री.), नरमाई (स्त्री.)

**Lenient** *adj.* सौम्य, नरम

**Lenient assessment** १ सौम्य मूल्यनिर्धारण (न.) २ सौम्य आकारणी (स्त्री.)

**Lenify** *v.t.* सौम्य करणे

**Lenity** = Leniency

**Lens** *n.* भिंग (न.)

**Leper** *n.* कुष्ठरोगी (सा.)

**Leprosy** *n. Med.* कुष्ठरोग (पु.), कुष्ठ (न.)

**Leprosy hospital** कुष्ठ रुग्णालय (न.)

**Less** *adj.* अल्प, कमी, थोडा

**-less** *suff.* –हीन, –शून्य, –रहित, –विरहित

**Less-developed** *adj.* अल्पविकसित

**Lessee** *n. Law* (one to whom a lease is given) पट्टेदार (सा.)

**Lessen** *v.t. & i.* कमी करणे, कमी होणे

**Lesson** *n.* पाठ (पु.), धडा (पु.)

**Lesson notes** पाठटिप्पणी (स्त्री.)

**Lessor** *n. Law* पट्टाकार (पु.), पट्ट्याने देणारा (पु.)

**Lest** *conj.* अन्यथा, नाहीतर

**Let** *v.t.* १ भाड्याने देणे २ परवानगी देणे *cf.* Permit ३ (to lease) पट्ट्याने देणे

**Let down** १ निराश करणे, तोंडघशी पाडणे २ पडू देणे

**Lethal** *adj.* प्राणहारक

*cf.* Deadly मारक
Fatal मरणांतक
Mortal प्राणघातक

**Lethal chamber** प्राणहारक कोष्ठ (पु.)

**Lethal weapon** प्राणहारक शस्त्र (न.)

**Lethargic** *adj.* सुस्त, निरुत्साही

**Lethargy** *n.* १ निद्रालस्य (न.) २ निरुत्साह (पु.)

**Let in** आत सोडणे, आत येऊ देणे

**Let off** १ (as, an arrow) उडवणे, सोडणे २ (as, from obligation) सोडवणे, मुक्त करणे

**Letter** *n.* १ अक्षर (न.) २ पत्र (न.)
  **Circular letter** परिपत्रक
  **Covering letter** उपरिपत्र
  **Demi-official letter** अर्धशासकीय पत्र
  **Forwarding letter** अग्रेषण पत्र

**Letter-box** = **Post-box**

**Letter-head** *n.* नाममुद्रित पत्र (न.)

**Lettering** *n.* अक्षरवळण (न.)

**Letter of advice** सूचनापत्र (न.)

**Letter of authority** प्राधिकारपत्र (न.)

**Letter of credit** पतपत्र (न.)

**Letter of hypothecation** तारणगहाण पत्र (न.)

**Letter of introduction** परिचयपत्र (न.)

**Letterpress** *n. Print.* अक्षरमुद्रण (न.)

**Letters of administration** *Law* प्रबंधपत्र (न.)

**Letters patent** एकस्व पत्र (न.)

**Leucaemia** = **Leuchaemia** *n. Med.* पंडुरोग (पु.)

**Leucoderma** *n.* श्वेतकुष्ठ (न.)

**Leukaemia** = **Leucaemia**

**Levee** *n.* पूरतट (पु.)

**Level** *n.* १ पातळी (स्त्री.) २ *Lit. & Fig.* पातळी (स्त्री.), स्तर (पु.)
  *adj.* १ (even, flat) सपाट २ (of the same height) सारख्या उंचीचा ३ (well-balanced, even, just, impartial) समतोल
  *v.t.* १ सारखा करणे २ सपाट करणे, समतल करणे ३ (to overthrow) जमीनदोस्त करणे ४ रोखणे
  (*to level a charge* दोषारोप करणे)

**Level-crossing** *n. Rly.* रेल्वे ओलांडणी (स्त्री.)

**Levelling** *n.* समतलन (न.)

**Levelling instrument** समतलन उपकरण (न.)

**Levelling-staff** *n.* समतलन दंड (पु.)

**Levelness** *n.* सारखेपणा (पु.), सपाटी (स्त्री.)

**Level of administration** प्रशासन स्तर (पु.)

**Level of nutrition** पोषण स्तर (पु.)

**Lever** *v.t.* तरफ लावणे
  *n.* तरफ (स्त्री.)

**Leverage** *n.* (तरफेमुळे झालेला) यांत्रिक लाभ (पु.)

**Leviable** *adj.* १ करयोग्य २ वसुलीयोग्य

**Levied** *adj.* १ (कर) आकारलेला, (दंड) बसवलेला २ (कर) वसूल केलेला, (दंड) वसूल केलेला

**Levity** *n.* थिल्लरपणा (पु.)

**Levy** *v.t.* १ (to impose) (दंड, कर इत्यादि) बसवणे २ (to raise, collect as, contribution, taxes, etc.) (पट्टी, कर इत्यादि) वसूल करणे
  *n.* वसुली (स्त्री.) *cf.* Duty

**Levy a tax** १ कर बसवणे २ करवसुली करणे

**Levying** *n.* वसूल करणे (न.)

**Lewd** *adj.* स्वैराचारी

**Lewdness** *n.* स्वैराचार (पु.)

*Lex*, *n.* (a law) विधि (पु.)

*Lex domicilii* (the law of the domicile) अधिवास विधि (पु.)

**Lexicographer** *n.* कोशकार (पु.)
**Lexicographic** *adj.* कोशरचनेसंबंधी
**Lexicographist** *n.* कोशरचनाकार (पु.)
**Lexicography** *n.* कोशरचना (स्त्री.)
**Lexicologist** *n.* कोशशास्त्रज्ञ (सा.)
**Lexicology** *n.* कोशशास्त्र (न.)
**Lexicon** *n.* शब्दकोश (पु.)
**Ley** *v.t. Agric.* (to plant or sow a field with grass, etc.) पेरणे
**Liability** *n.* १ भार (पु.) २ *Law* (that for which one is liable as, debts, pecuniary obligations, etc.) दायित्व (न.)
**Liability per claim** प्रत्येक दाव्याबाबतचे दायित्व (न.)
**Liable** *adj.* १ *Law* दायित्व असलेला २ (with *to*) पात्र ३ (responsible – with *for*) उत्तरदायी, जबाबदार
**Liaison** *n.* १ संपर्क (पु.) २ प्रेमसंबंध (पु.)
**Liar** *n.* खोटे बोलणारा (पु.)
**Libel** *n. Law* लेखी बदनामी (स्त्री.) *v.t.* लेखी बदनामी करणे *cf.* Defame
**Libellous** *adj.* बदनामीकारक
**Liberal** *adj.* १ उदार २ दानशूर ३ उदारमतवादी, मवाळ ४ प्रागतिक ५ सढळ *n.* उदारमतवादी (सा.)
**Liberal education** उदार शिक्षण (न.)
**Liberalise** *v.t.* १ उदार बनवणे २ (as, rules, etc.) शिथिल करणे
**Liberalism** *n.* (the principles of a Liberal in politics or religion) उदारमतवाद (पु.)
**Liberality** *n.* औदार्य (न.)
**Liberally** *adv.* १ उदारपणाने २ (not literally) अर्थाला धरून
**Liberate** *v.t.* स्वतंत्र करणे
**Liberation** *n.* स्वातंत्र्य (न.)
**Liberator** *n.* स्वातंत्र्यदाता (पु.)
**Liberticide** *n.* स्वातंत्र्यशत्रु (पु.)
**Libertine** *n.* स्वैराचारी (पु.)
**Libertinism** *n.* स्वैराचारवाद (पु.)
**Liberty** *n.* स्वतंत्रता (स्त्री.), स्वातंत्र्य (न.)
  **Absolute liberty** अबाधित स्वातंत्र्य
  **Civil liberty** नागरिक स्वातंत्र्य
  **Individual liberty** व्यक्तिस्वातंत्र्य
  **Personal liberty** वैयक्तिक स्वातंत्र्य
  **Political liberty** राजकीय स्वातंत्र्य
**Liberty of press** मुद्रण स्वातंत्र्य (न.)
**Liberty of speech** भाषण स्वातंत्र्य (न.)
**Libido** *n.* कामवृत्ति (स्त्री.)
**Librarian** *n.* ग्रंथपाल (सा.)
**Library** *n.* ग्रंथालय (न.)
**Licence** *n.* अनुज्ञप्ति (स्त्री.), लायसेन्स (न.)
  **Export licence** निर्यात अनुज्ञप्ति
  **Game-licence** शिकार अनुज्ञप्ति
  **General licence** सर्वसामान्य अनुज्ञप्ति
  **Import licence** आयात अनुज्ञप्ति
  **Replacement licence** पुनःस्थापन अनुज्ञप्ति
  **Special licence** विशेष अनुज्ञप्ति
**Licence-holder** *n.* अनुज्ञप्तिधारक (सा.)
**Licensable** *adj.* अनुज्ञप्ती देण्याजोगा
**License** *v.t.* अनुज्ञप्ती देणे *cf.* Permit
**Licensed** *adj.* अनुज्ञप्ती मिळालेला
**Licensee** *n.* अनुज्ञप्तिधारक (सा.)
**Licenser** = **Licensor**
**Licensing Act** अनुज्ञापन अधिनियम (पु.)

**Licensing authority** अनुज्ञापक प्राधिकरण (न.)

**Licensor** *n. Law* अनुज्ञप्तिदाता (पु.)

**Licentiate** *n.* (one who possesses a licence to practise a profession) अनुज्ञप्तिधारक (सा.)

**Licentious** *adj.* स्वैराचारी

**Licentiousness** *n.* स्वैराचारिता (स्त्री.)

**Lick** *v.t.* चाटणे

**Lid** *n.* झाकण (न.), टोपण (न.)

**Lie** *n.* खोटे बोलणे (न.)

*v.i.* १ खोटे बोलणे २ पडून राहणे, पडून असणे ३ आडवे होणे ४ असणे

**Liege** *adj.* (loyal, faithful) स्वामिनिष्ठ

**Lien** *n. Law* धारणाधिकार (पु.)

**Lieutenant-governor** *n.* उपराज्यपाल (सा.)

**Life** *n.* १ जीवन (न.), जीवित (न.) २ जीव (पु.), प्राण (पु.) ३ आयु (न.)

*adj.* (in comb.) आजीव

**Life-annuity** *n.* आजीव वार्षिकी (स्त्री.)

**Life-annuity fund** आजीव वार्षिकी निधि (पु.)

**Life-assurance** = **Life-insurance**

**Life-belt** *n.* प्राणरक्षक पट्टा (पु.)

**Lifeboat** *n.* प्राणरक्षक नौका (स्त्री.)

**Life-buoy** *n.* प्राणरक्षक बोया (पु.)

**Life certificate** आयु प्रमाणपत्र (न.), हयातीचा दाखला (पु.)

**Life convict** *Law* जन्मठेप भोगणारा (पु.)

**Life-force** *n.* चैतन्य (न.), जीवनशक्ति (स्त्री.)

**Life-history** *n.* जीवनवृत्त (न.)

**Life imprisonment** *Law* जन्मठेप (स्त्री.), आजीव कारावास (पु.)

**Life-insurance** *n.* आयुर्विमा (पु.)

**Life-insurance policy** आयुर्विमापत्र (न.)

**Life-interest** *n. Law* आजीव हितसंबंध (पु.)

**Lifeless** *adj.* निर्जीव

**Lifelessness** *n.* निर्जीवपणा (पु.)

**Lifelike** *adj.* सजीवसदृश

**Lifelong** *adj.* आजीव

**Life member** आजीव सदस्य (सा.)

**Life sentence** *Law* (a sentence of imprisonment for one's term of life) जन्मठेपेची शिक्षा (स्त्री.)

**Life-size** *adj.* पूर्णाकृति

**Lifetime** *n.* हयात (स्त्री.), आयुष्य (न.)

**Lift** *v.t. & i.* १ वर उचलणे २ (to pull up) चढवणे ३ (to steal) मारणे, लांबवणे ४ (to try to raise something) उचलण्याचा प्रयत्न करणे ५ (to rise) वर जाणे

*n.* १ उत्थान (न.) २ (the place or distance through which anything is lifted) उत्थानांतर (न.) ३ (that by means of which a person lifts or is lifted up) उद्वहन यंत्र (न.), उद्वाहक (पु.), लिफ्ट (स्त्री.)

**Lift irrigation** उद्धरण सिंचन (न.)

**Lift irrigation system** उद्धरण सिंचन पद्धति (स्त्री.)

**Liftman** *n.* लिफ्टवाला (पु.)

**Lift up** (to improve in rank, to exalt) उच्चस्थितीला नेणे

**Ligament** *n.* संधिबंधन (न.)

**Ligature** *n.* १ जोडाक्षर (न.) २ *Print.* युक्ताक्षर (न.) ३ (thing used in tying) बंध (पु.)

**Light** *n.* १ प्रकाश (पु.), उजेड (पु.) २ दिवा (पु.) ३ (the medium through which light is admitted, as window, a skylight) प्रकाशमार्ग (पु.)
*adj.* १ (not heavy) हलका, लघु २ (not difficult, easy) सोपा, साधासुधा, हलका-फुलका ३ सुगम (as in : light music सुगम संगीत) ४ (not important, slight) हलका ५ पातळ ६ (nimble, agile) चपळ ७ (gay, lively) प्रसन्न ८ (not dark, pale-coloured) फिका
*v.t.* १ (to kindle) पेटवणे २ (to give light) प्रकाशित करणे ३ (to illuminate) उज्ज्वलित करणे

**Light-armed** *adj.* लघुशस्त्रधारी

**Light arms** *Mil.* लघुशस्त्रे (न. अ. व.)

**Light artillery** हलका तोफखाना (पु.)

**Lighten** *v.t.* १ प्रकाशित करणे २ हलका करणे

**Lighter** *n.* १ ज्वालक (पु.), चकमक (स्त्री.) २ (a large boat mainly used in loading or unloading vessels) पडाव (पु.)

**Lighterage** *n.* (price paid for unloading) उतरणावळ (स्त्री.)

**Light-footed** *adj.* १ पायसूट २ चपळ

**Lighthouse** *n.* दीपगृह (न.)

**Light-infantry** *n.* चपळ पायदळ (न.)

**Lighting** *n.* १ उजेड (पु.) २ दिवाबत्ती (स्त्री.) ३ प्रकाशयोजना (स्त्री.)

**Lightly** *adv.* १ हळूच २ चपळतेने ३ वरवर ४ सहज ५ बेफिकिरीने

**Lightning** *n.* वीज (स्त्री.), तडित् (स्त्री.)

**Lightship** *n.* प्रकाशनौका (स्त्री.)

**Light tea** अल्पोपाहार (पु.)

**Like** *v.t. & i.* १ आवडणे २ इच्छिणे, इच्छा असणे
*n.* (usu. *pl.*) आवड (स्त्री.)
*adj.* १ (similar) समान २ तुल्य, सदृश, सम, सारखा
*adv.* –प्रमाणे, बरोबर, –वजा

**Likelihood** *n.* शक्यता (स्त्री.), संभाव्यता (स्त्री.), संभव (पु.)

**Likeliness** *n.* संभाव्यता (स्त्री.)

**Likely** *adj.* १ संभाव्य, संभवनीय *cf.* Possible २ –जोगा, –सारखा
*adv.* बहुधा, बहुतकरून, संभाव्यतः

**Likeness** *n.* सारखेपणा (पु.), सादृश्य (न.) साम्य (न.)

**Likewise** *adv.* तसेच, त्याचप्रमाणे

**Liking** *n.* आवड (स्त्री.)

**Limb** *n.* १ गात्र (न.), अंग (न.), अवयव (पु.) २ शाखा (स्त्री.)

**Lime** *v.t.* चुना लावणे
*n.* १ लिंबाचे झाड (न.) २ लिंबू (न.) ३ चुना (पु.)

**Limekiln** *n.* चुन्याची भट्टी (स्त्री.)

**Limestone** *n.* चुनखडी (स्त्री.), चुनखडक (पु.)

**Limestone rock** चुनखडीचा खडक (पु.)

**Lime-water** *n.* चुन्याची निवळी (स्त्री.)

**Limit** *v.t.* १ मर्यादित करणे २ सीमित करणे
*n.* १ मर्यादा (स्त्री.) २ सीमा (स्त्री.)

**Limitation** *n.* १ (the limiting or marking out of an estate in property) परिसीमन (न.), सीमांकित करणे (न.) २ (restrictions of powers e.g. constitutional limitations) मर्यादा (स्त्री.) ३ *Law* (legally specified period beyond which the claimant shall not enforce his claims by suit) मुदत (स्त्री.)

**Limited** *adj.* १ मर्यादित २ सीमित

**Limited cheque** सीमित धनादेश (पु.)

**Limited company** मर्यादित कंपनी (स्त्री.)

**Limited fee-simple** = Qualified fee-simple

**Limited guarantee** मर्यादित हमी (स्त्री.)

**Limited liability** मर्यादित दायित्व (न.)

**Limiting** *adj.* मर्यादित करणारा

**Limit of motion** प्रस्तावाची मुदत (स्त्री.)

**Limp** *v.i.* लंगडणे

*adj.* लवचिक, बिलबिलीत

**Limpid** *adj.* नितळ, निवळ, निर्मळ

**Linchpin** *n.* चाकाची खीळ (स्त्री.)

**Line** *v.t. & i.* १ ओळीत ठेवणे, ओळीत असणे २ रांगेत उभे करणे, रांगेत उभे राहणे ३ रेघा मारणे ४ अस्तर लावणे

*n.* १ *Math.* (that which has length without breadth or thickness) रेघ (स्त्री.), रेषा (स्त्री.), रेखा (स्त्री.) २ (a row) ओळ (स्त्री.), रांग (स्त्री.) ३ (a series or succession of ancestors or descendants of a given person) वंशक्रम (पु.), परंपरा (स्त्री.) ४ (a thread, cord) सूत (न.) ५ (the piping for conveying a fluid as steam, gas, water, oil, etc. from one location to another) नळ (पु.) ६ (a direction, course of procedure) दिशा (स्त्री.), प्रणाली (स्त्री.) ७ *Elec.* वीजमार्ग (पु.) ८ *Elec.* विजेची तार (स्त्री.) ९ (a number of public conveyances, as carriages or vessels plying regularly under one management over a certain route) (सार्वजनिक वाहनांचा) मार्ग (पु.) १० *Rly.* रेल्वेमार्ग (पु.) ११ (as, occupation, etc.) पेशा (पु.)

**Lineage** *n.* वंशावळ (स्त्री.)

**Lineal** *adj.* १ वंशपरंपरागत २ *Law* एकरेषीय, पैतृक

**Lineal consanguinity** *Law* एकरेषीय रक्तसंबंध (पु.)

**Lineality** *n.* वंशपरंपरा (स्त्री.)

**Lineally** *adv.* वंशपरंपरेने, वंशानुक्रमाने

**Linear** *adj.* रेषाकृति, रेखाकृति, रेखीय

**Lined** *adj.* अस्तर लावलेला

**Lined well** पक्की विहीर (स्त्री.)

**Lineman** *n.* तारमार्ग तंत्री (पु.)

**Linen** *n.* १ तागाचे कापड (न.), सणाचे कापड (न.) २ कापसाचे कापड (न.) ३ लिनन (न.)

**Linen department** वस्त्र विभाग (पु.)

**Linen-keeper** *n.* वस्त्रपाल (पु.)

**Liner** *n.* १ उतारू जहाज (न.) २ टपाली विमान (न.)

**Linger** *v.t. & i.* १. (to stay long) रेंगाळणे २ (to proceed sluggishly) रखडणे ३ (to protract, to draw out) लांबणीवर टाकणे

**Lingua franca** जनभाषा (स्त्री.)

**Linguist** *n.* १ बहुभाषाभिज्ञ (सा.) २ भाषाशास्त्रज्ञ (सा.)

**Linguistics** *n.* भाषाशास्त्र (न.)

**Liniment** *n.* लिनिमेंट (न.)

**Lining** *n.* १ अस्तर (न.) २ पंक्तिबंधन (न.)

**Link** *n.* १ कडी (स्त्री.) २ दुवा (पु.) *v.t.* १ जोडणे २ दुवा जोडणे

**Linked file** जोडलेली फाईल (स्त्री.), संबद्ध फाईल (स्त्री.)

**Linking** *n.* जोडणे (न.)

**Link road** जोडरस्ता (पु.)

**Linoleum** *n.* लिनोलियम (न.)

**Lino mechanic** पंक्तिमुद्रण यांत्रिक (पु.)

**Lino operator** पंक्तिमुद्रणयंत्र चालक (पु.)

**Linotype** *n. Print.* १ पंक्तिमुद्राक्षर (न.) २ पंक्तिमुद्रण यंत्र (न.)

**Linseed** *n.* अळशी (स्त्री.), जवस (न.)

**Lint** *n. Pharm.* लिंट (न.)

**Lintel** *n.* दारमाथा (पु.)

**Lip** *n.* ओठ (पु.)

**Lip sympathy** शाब्दिक सहानुभूति (स्त्री.)

**Liquefied** *adj.* द्रवीकृत

**Liquefy** *v.t. & i.* द्रवरूप करणे, द्रवरूप होणे

**Liquid** *adj.* १ पातळ, द्रवरूप, द्रव— २ *Com.* (easily convertible into cash) रोकडसुलभ (as in : liquid assets रोकड सुलभ मत्ता)
*n.* द्रव (पु.)

**Liquidate** *v.t.* १ *Law* (to determine by agreement or by litigation the precise amount of indebtedness or damages) निर्धारित करणे २ *Law* (to ascertain the amount, or the several amounts, of the liabilities of a firm, company, etc. and apportion the assets toward the discharge of the indebtedness, as in winding up) परिसमापन करणे ३ (to discharge, to pay off) फेड करणे ४ *Fig.* (to clear up and dispose of as if by such a process) निर्मूलन करणे (as in : to liquidate illiteracy निरक्षरतेचे निर्मूलन करणे)

**Liquidated** *adj.* १ निर्धारित २ परिसमापित

**Liquidated damages** *Law* निर्धारित नुकसानभरपाई (स्त्री.)

**Liquidation** *n.* १ (as, of a company) परिसमापन (न.) २ दिवाळे (न.) (*to go into liquidation* १ परिसमापन होणे २ दिवाळे काढणे)

**Liquidator** *n. Law* परिसमापक (पु.)

**Liquidity** *n.* १ (of a substance) द्रवरूपता (स्त्री.) २ *Com.* (of assets, etc.) रोकडसुलभता (स्त्री.)

**Liquor** *n.* मद्य (न.), दारू (स्त्री.)

**Liquor shop** दारूचा गुत्ता (पु.), दारूचे दुकान (न.)

*Lis*, *n.* (a suit, action) वाद (पु.)

*Lis pendens*, *Law* (the doctrine of the 'pending suit') 'प्रलंबित वाद' तत्त्व (न.)

**List** *n.* सूची (स्त्री.), यादी (स्त्री.) *v.t.* यादी करणे

**Listed** *adj.* सूचीबद्ध

**Listen** *v.i.* १ ऐकणे २ लक्ष देणे

**Listener** *n.* श्रोता (पु.)

**Listener report** श्रवण प्रतिवेदन (न.)

**Lister** *n.* यादीकार (पु.)

**Listing** *n.* यादी बनवणे (न.)

**Listless** *adj.* निरुत्साही

**Listlessness** *n.* निरुत्साह (पु.)

**List of business** कामकाजाची यादी (स्त्री.)

**List of payment** अधिदानसूची (स्त्री.)

**List of prices** किंमत यादी (स्त्री.), विक्रीदर यादी (स्त्री.)

*Lite pendente*, *Law* (pending the suit) वाद प्रलंबित असताना

**Liter** = **Litre**

**Literacy** *n.* साक्षरता (स्त्री.)

**Literal** *adj.* शब्दशः

**Literal interpretation** शब्दशः निर्वचन (न.)

**Literally** *adv.* शब्दशः

**Literary** *adj.* साहित्यिक, वाङ्मयीन

**Literary language** साहित्यिक भाषा (स्त्री.)

**Literate** *n.* साक्षर (सा.)
*adj.* साक्षर

**Literature** *n.* साहित्य (न.), वाङ्मय (न.)

**Litho—** (used in comb.) शिला—

**Lithograph** *n.* शिलामुद्रित (न.)

**Lithography** *n.* शिलामुद्रण (न.)

**Litigant** *n.* *Law* पक्षकार (पु.)

**Litigate** *v.t.* & *i.* न्यायालयात जाणे

**Litigated** *adj.* न्यायालयापुढे नेलेला

**Litigation** *n.* १ न्यायालयात जाणे (न.) २ वाद (पु.)

**Litigious** *adj.* १ (addicted to litigation) वादशील २ (subject of a suit or action) वादपात्र

**Litigious right** वादानुगत अधिकार (पु.)

**Litmus** *n.* लिटमस (पु.)

**Litre** *n.* (a measure) लिटर (पु.)

**Litter** *n.* १ केरकचरा (पु.) २ (a couch carried by men or beasts) मेणा (पु.) ३ (a brood of animals) पिलावळ (स्त्री.) ४ (a stretcher) रुग्णपट (पु.)
*v.t.* अस्ताव्यस्त टाकणे

*Litterateur*, *n.* (a literary man) साहित्यिक (सा.)

**Little** *adj.* १ थोडा २ लहान, लघु

**Littoral** *adj.* किनारपट्टीचा

**Livable** *adj.* १ (habitable) राहण्यास योग्य २ (worth living) जगण्यास योग्य

**Live** *v.i.* १ (to be alive, to have life) जिवंत राहणे, जगणे २ (to be maintained in life, to subsist) निर्वाह करणे
*adj.* १ (living, not dead) सजीव, जिवंत २ जळता (as in : live coal जळता कोळसा) ३ (electrically charged) वीजयुक्त

**Liveable** = **Livable**

**Livelihood** *n.* उपजीविका (स्त्री.)

**Liveliness** *n.* तरतरी (स्त्री.)

**Lively** *adj.* १ (lifelike) सजीव, जिवंत २ (active) तरतरीत

**Liver** *n.* यकृत (न.)

**Live register** चालू नोंदवही (स्त्री.)

**Livery** *n.* (any characteristic garb) वर्दीवेष (पु.)

**Lives** *n. pl.* प्राणिमात्र (पु.)

**Livestock** *n.* पशुधन (न.)

**Live-wire** *n.* वीजयुक्त तार (स्त्री.)

**Living** *n.* १ राहणी (स्त्री.) २ निर्वाह (पु.)
*adj.* १ हयात २ जिवंत, सजीव

**Living-room** *n.* बैठकीची खोली (स्त्री.)

**Living wage** *Econ.* निर्वाह वेतन (न.)

**Load** *n.* भार (पु.), ओझे (न.)
*v.t.* १ भरणे २ लादणे

**Loaded** *adj.* भरलेला

**Loaded arm** भरलेले शस्त्र (न.)

**Loading** *n.* १ भरणे (न.) २ लादणे (न.)

**Loading charges** भरणावळ (स्त्री.)

**Loaf** *n.* पाव (पु.), रोटी (स्त्री.)
*v.i.* उनाडणे

**Loafer** *n.* उडाणटप्पू (पु.)

**Loan** *v.t.* १ उसने देणे २ कर्जाऊ देणे, कर्ज देणे
*n.* कर्ज (न.)
*cf.* Borrowing उसने घेणे, कर्ज घेणे·
Debt ऋण

**Loanee** *n.* ऋणको (सा.)

**Loathe** *v.t.* वीट येणे
*n.* वीट (पु.)

**Loathsome** *adj.* ओंगळ

**Lobby** *n.* सभाकक्ष (पु.)
*v.t.* १ (to address or solicit members of a legislative body in the lobby or elsewhere, as before a committee, with intent to influence legislation) सभाकक्षात प्रचार करणे
२ (to urge or procure the passage of a bill, measures, etc. by lobbying; also to influence or pursuade a legislator by lobbying) सभाकक्षात मतार्जन करणे

**Local** *adj.* १ स्थानिक २ अंगीय

**Local anaesthesia** *Med.* अंगीय बधिरीकरण (न.)

**Local assets** स्थानिक मत्ता (स्त्री.)

**Local audit** स्थानिक लेखापरीक्षा (स्त्री.)

**Local authority** १ स्थानिक प्राधिकारी (सा.) २ स्थानिक प्राधिकरण (न.)

**Locale** *n.* १ स्थान (न.) २ घटनास्थळ (न.)

**Local fund** स्थानिक निधि (पु.)

**Local government** स्थानिक शासन (न.)

**Localisation** *n.* स्थानिकीकरण (न.) स्थानन (न.)

**Localise** *v.t.* १ ठिकाण ठरवणे २ (to restrict to a particular place) स्थानसीमित करणे, स्थानित करणे

**Localised** *adj.* १ स्थानिक २ स्थानसीमित, स्थानित

**Localised industries** स्थानसीमित उद्योग (पु. अ. व.)

**Locality** *n.* वसतिस्थान (न.)

**Local law** स्थानिक विधि (पु.)

**Locally** *adv.* स्थानपरत्वे, स्थानिक रीत्या

**Local self-government** स्थानिक स्वराज्य (न.)

**Local time** स्थानिक वेळ (स्त्री.)

**Local train** लोकल गाडी (स्त्री.)

**Local usage** *Law* स्थानिक परिपाठ (पु.)

**Local value** १ स्थानिक मूल्य (न.) २ स्थानिक किंमत (स्त्री.)

**Locate** *v.t.* १ (to designate the site or place) स्थान ठरवणे, स्थाननिश्चयन करणे, स्थाननिर्देश करणे २ ठावठिकाणा लागणे

**Located** *adj.* १ स्थित, –ठिकाणी असलेला २ ठावठिकाणा लागलेला

**Location** *n.* १ स्थान (न.) २ स्थाननिश्चयन (न.) ३ ठावठिकाणा (पु.)

**Lock** *n.* १ कुलूप (न.), टाळे (न.) २ (बंदुकीचा) चाप (पु.)
*v.t.* & *i.* १ कुलूप लावणे २ (to jam, to close fast) घट्ट बसणे

**Locker** *n.* कुलुपाचा खण (पु.), लॉकर (पु.)

**Locket** *n.* १ (a small lock) लहानसे कुलूप (न.) २ (a little case generally of gold or silver, attached to a necklace, containing a hair, a miniature or memento) ताईत (पु.), पदक (न.), लॉकेट (न.)

**Locking up** (as, the jury) संरुद्ध करणे

**Lockout** *n.* टाळेबंदी (स्त्री.)

**Lock up** कच्च्या कैदेत टाकणे

**Lock-up** *n.* १ कच्ची कैद (स्त्री.) *cf.* Confinement २ अटककोठडी (स्त्री.)

**Locomotion** *n.* १ (moving from place to place, progressive movement, travel) स्थलांतरण (न.) २ गति (स्त्री.)

**Locomotive** *n.* १ गतियंत्र (न.) २ चलित्र (न.)

**Locum-tenens** *n.* मुतालिक (सा.)

**Locus** *n.* १ निश्चित स्थान (न.), निश्चित स्थिति (स्त्री.) २ *Math.* पथ (पु.), निर्बिंस (निबद्ध बिंदु सट) (पु.)

*Locus standi* १ (place of standing) सामाजिक स्थान (न.) २ वैध स्थिति (स्त्री.)

**Locust** *n.* टोळ (पु.)

**Locution** *n.* भाषणपद्धति (स्त्री.)

**Lode** *n.* *Geol.* धातुकशीर (स्त्री.)

**Lodge** *v.t.* & *i.* १ निवास करणे २ (as, a complaint, suit, etc.) दाखल करणे
*n.* निवास (पु.)

**Lodger** *n.* निवासी (सा.)

**Lodging** *n.* १ निवास (पु.) *cf.* Flat २ बिऱ्हाड (न.)

**Lodging-house** *n.* निवासगृह (न.)

**Loft** *n.* माळा (पु.)

**Lofty** *adj.* १ उंच, उच्च २ उदात्त

**Log** *n.* १ ओंडका (पु.) २ (the record of the rate of a ship's speed of her daily progress) नौका रोजनामा (पु.)

**Log-book** *n.* १ रोजवही (स्त्री.) २ (a record of daily progress of a ship) नौका रोजनामा (पु.)

**Loggerhead** *n.* १ (a blockhead) मठ्ठ (सा.) २ *Zool.* (a very large turtle) मोठे कासव (न.)
(*to be at loggerheads*–मध्ये कलह असणे)

**Logic** *n.* तर्कशास्त्र (न.)

**Logical** *adj.* तर्कसंगत, तर्कशुद्ध

**Logically** *adv.* तर्कशास्त्रानुसार

**Logician** *n.* १ तार्किक (सा.) २ तर्कशास्त्रज्ञ (सा.)

**Logistics** *n. pl.* *Mil.* सेनास्थापन तंत्र (न.)

**Logogram** *n.* शब्दसंक्षेपचिन्ह (न.)

**Logography** *n.* अखंड शब्दमुद्रण (न.)

**Loin** *n.* कंबर (स्त्री.)

**Loiter** *v.i.* रमतगमत जाणे

**Lone** = **Lonely**

**Loneliness** *n.* एकाकीपणा (पु.)

**Lonely** *adj.* १ (solitary, retired, unfrequented) विजन, बिनराबत्याचा २ (addicted to solitude) एकलकोंडा ३ (alone) एकाकी

**Lonesome** *adj.* निर्जन

**Lonesomeness** *n.* निर्जनता (स्त्री.)

**Long** *adj.* १ लांब २ (extended in time or far-extending) दीर्घ
*adv.* (extending over a great or considerable reach of time) दीर्घकाल, दीर्घकालिक
*v.i.* प्रबळ इच्छा धरणे
(*as long as* –पावेतो)

**Longevity** *n.* १ (long duration of life) दीर्घायुष्य (न.) २ (length of life) आयुर्मान (न.)

**Longimetry** *n.* दूरत्वमिति (स्त्री.)

**Longitude** *n.* १ *Geog.* रेखांश (पु.) २ *Astron.* ज्योतिष-रेखांश (पु.)

**Longitudinal** *adj.* १ रेखांशिक २ उभा, अनुलंब

**Longitudinal section** अनुलंब छेद (पु.)

**Long-range** *adj.* १ दीर्घकालीन २ लांब पल्ल्याचा

**Long rate** दीर्घकालिक दर (पु.)

**Long sight** दीर्घ दृष्टि (स्त्री.)

**Long-staple** *adj.* लांब धाग्याचा

**Long-staple cotton** लांब धाग्याचा कापूस (पु.)

**Long-term** *adj.* दीर्घ मुदतीचा

**Long-term credit** दीर्घ मुदतीची उधारी (स्त्री.)

**Long-term lease** दीर्घ मुदतीचा पट्टा (पु.)

**Long-term plan** दीर्घ मुदतीची योजना (स्त्री.)

**Long title** १ पूर्ण नाव (न.) २ पूर्ण शीर्षक (न.)

**Long-wave** *adj.* *Radio* दीर्घलहरी–

**Look** *v.t. & i.* १ पाहणे २ दिसणे ३ भासणे, वाटणे
*n.* १ मुद्रा (स्त्री.) २ रूप (न.)

**Look after** १ देखरेख ठेवणे २ संगोपन करणे

**Look down** तुच्छ लेखणे

**Looking-glass** *n.* आरसा (पु.)

**Look into** १ पाहणे, विचार करणे २ लक्ष देणे

**Look out** १ लक्ष देणे २ शोधात असणे

**Loom** *n.* माग (पु.)
*v.i.* १ क्षितिजावर चमकणे २ अंधुक अंधुक दिसणे

**Loop** *n.* १ फास (पु.) २ कानी (स्त्री.) ३ गर्भाशयवलय (न.)

**Loophole** *n.* १ गवाक्ष (न.) २ (a means of escape or evasion) पळवाट (स्त्री.)

**Loose** *adj.* १ (slack) ढिला, सैल २ (free from bonds) मोकळा ३ (disconnected) असंबद्ध ४ फुटकळ, सुटा ५ (dissolute, immoral, lewd) सैल वर्तनाचा ६ (not compact, not serried) विरळ

**Loosely** *adv.* ढिलाईने, सैलपणे

**Loosen** *v.t.* १ सैल करणे २ मोकळा करणे

**Looseness** *n.* १ ढिलेपणा (पु.), सैलपणा (पु.) २ विरळपणा (पु.)

**Lop** *v.t.* *Forestry* (to cut off one or more branches of a tree) फांद्या तोडणे

**Lopping** *n.* *Forestry* फांद्या तोडणी (स्त्री.)

**Lop-sided** *adj.* विषमतोल

**Loquacious** *adj.* वाचाळ

**Lord** *n.* १ स्वामी (पु.), मालक (पु.) २ उमराव (पु.)

**Lordly** *adv.* डौलाने, दिमाखाने *adj.* अहंमन्य

**Lordship** *n.* १ (dominion, power, authority) स्वामित्व (न.) २ (a title, applied to a lord or a judge) श्रीमान (पु.), लॉर्ड (पु.)

**Lore** *n.* विद्या (स्त्री.)

**Lorry** *n.* मालमोटार (स्त्री.)

**Lose** *v.t.* १ (to fail to keep possession of) हरवणे, गमावणे २ (to be deprived of) मुकणे ३ (to suffer loss through the death or removal of) अंतरणे ४ (to fail to gain or win) हरणे ५ (to wander from, to go astray from) चुकणे

**Loser** *n.* १ गमावणारी व्यक्ति (स्त्री.) २ हरणारी व्यक्ति (स्त्री.)

**Loss** *n.* १ हानि (स्त्री.), तोटा (पु.) २ हार (स्त्री.) ३ गमावणे (न.)

**Lost** *adj.* १ गहाळ २ गमावलेला, घालवलेला ३ हरलेला ४ चुकलेला

**Lost property** गहाळ वस्तु (स्त्री.)

**Lot** *n.* १ (a group of articles offered as an item for sale) संच (पु.), ढीग (पु.) २ नशीब (न)
(*by lot* चिठ्ठया टाकून)

**Lotion** *n.* औषधी द्रावण (न.)

**Lottery** *n.* १ लॉटरी (स्त्री.) २ सोडत (स्त्री.)

**Loud** *adj.* १ मोठा, उच्च २ (noisy, clamorous) ओरडचा ३ (emphatic) जोरदार ४ भडक (as in : loud colour भडक रंग)

**Loud applause** टाळयांचा कडकडाट (पु.)

**Loudly** *adv.* मोठयाने

**Loud-speaker** *n.* ध्वनिक्षेपक (पु.)

**Lounge** *n.* आरामकक्ष (पु.)

**Louver** = **Louvre** *n.* धुराडे (न.)

**Lovable** *adj.* गोड

**Love** *n.* प्रीति (स्त्री.), प्रेम (न.)
*v.t.* १ प्रेम करणे २–ची आवड असणे

**Loveliness** *n.* रमणीयता (स्त्री.)

**Lovely** *adj.* रमणीय

**Lover** *n.* १ शौकीन (सा.), प्रेमी (सा.) २ प्रियकर (पु.)

**Loving** *adj.* प्रेमळ, मायाळू

**Low** *adj.* १ निम्न, सखल, खोलगट (of relatively little importance or of inferior standing) क्षुद्र, हीन ३ (mean, base, coarse, vulgar) नीच ४ (wanting animation, depressed, dejected) विषण्ण ५ मंद ६ हळू ७ हलका

**Low-born** *adj.* हीनजात

**Low-bred** *adj.* हीन संस्काराचा

**Lower** *adj.* १ निम्न, खालचा २ अवर

**Lower age limit** खालची वयोमर्यादा (स्त्री.)

**Lower division** *Admin.* निम्न स्तर (पु.)

**Lower stage** खालचा टप्पा (पु.)

**Lowest** *adj.* निम्नतम, सर्वात खालचा

**Low-lying** *adj.* सखल, खोलगट

**Low paid employee** लघुवेतन कर्मचारी (सा.)

**Low-tide** = **Low-water** *n.* ओहोटी (स्त्री.)

**Loyal** *adj.* १ –निष्ठ २ निष्ठावंत

**Loyally** *adv.* निष्ठापूर्वक, निष्ठेने

[redacted]

**Loyalty** *n.* निष्ठा (स्त्री.)
*cf.* Allegiance निष्ठा
Devotion भक्ति, परायणता
Fealty स्वामिनिष्ठा
Fidelity एकनिष्ठा
**Lubber** *n.* अडाणी (सा.), ठोंब्या (पु.)
**Lubricant** *n.* वंगण (न.)
**Lubricate** *v.t.* वंगण लावणे, वंगण देणे
**Lubricating oil** वंगण तेल (न.)
**Lubrication** *n.* वंगवणी (स्त्री.)
**Lubricative** *adj.* वंगणक
**Lubricator** *n.* वंगणक (न.)
**Lucent** *adj.* चकचकीत
**Lucid** *adj.* १ सुबोध २ प्रसन्न ३ चकचकीत
**Lucidity = Lucidness** *n.* १ सुबोधता (स्त्री.) २ प्रसन्नता (स्त्री.) ३ चकचकीतपणा (पु.)
**Luck** *n.* भाग्य (न.), नशीब (न.)
**Luckily** *adv.* भाग्याने, नशिबाने
**Luckless** *adj.* कमनशिबी
**Lucky** *adj.* भाग्यवान, नशीबवान
**Lucrative** *adj.* लाभप्रद
**Lucre** *n.* अपलाभ (पु.)
**Ludicrous** *adj.* उपहास्य
**Lug** *n.* कानाची पाळी (स्त्री.)
*v.t.* जोराने ओढणे, जोराने खेचणे
**Luggage** *n.* सामान (न.)
**Luggage-carrier** *n.* सामान वाहक (न.)
**Luggage rate schedule** सामान दर अनुसूची (स्त्री.)
**Luggage-van** *n.* सामान यान (न.)
**Luke** *adj.* कोमट
**Lukewarm** *adj.* १ कोमट २ मंदोत्साह
**Lull** *v.t.* १ गाऊन निजवणे २ शांत करणे
**Lullaby** *n.* अंगाई गीत (न.)
**Lumbago** *n. Med.* कटिवात (पु.)
**Lumber** *n.* १ अडगळ (स्त्री.) २ ओंडका (पु.)
**Lumberer** *n.* रानतोडया (पु.)
**Lumberman** *n.* लाकडाचा व्यापारी (पु.)
**Lumber-room** *n.* अडगळीची खोली (स्त्री.)
**Luminance** *n.* दीप्ति (स्त्री.)
**Luminary** *n.* १ तेजस्वी तारा (पु.) २ तेजोगोल (पु.)
**Lumination** *n.* रोषणाई (स्त्री.)
**Luminescent** *adj.* दीप्तिमान, अनुदीप्तिशील
**Luminosity** *n.* दीप्ति (स्त्री.)
**Luminous** *adj.* १ (giving light) दीप्तिमय २ (shining, bright) देदीप्यमान
**Lump** *n.* १ गोळा (पु.) २ पुंज (पु.) ३ पिंड (पु.)
**Lump sum** ठोक रक्कम (स्त्री.)
**Lunacy** *n.* वेड (न.)
**Lunar** *adj.* चांद्र, चंद्र–, चंद्रासंबंधी
**Lunar day** चांद्रदिन (पु.)
**Lunar eclipse** *Astron.* चंद्रग्रहण (न.)
**Lunar month** चांद्रमास (पु.)
**Lunar year** चांद्रवर्ष (न.)
**Lunatic** *adj.* वेडा
*n.* वेडा (पु.)
**Lunch = Luncheon** *n.* मध्यान्ह भोजन (न.)
**Lunch-hour** *n.* भोजन वेळ (स्त्री.)
**Lung** *n.* फुप्फुस (न.)

**Lurch** *n.* १ (sudden lean to one side) (गलबताचा) गोता (पु.) २ अवसानघात (पु.)
(*to leave in the lurch* अवसानघात करणे)

**Lure** *n.* लालूच (स्त्री.)
*v.t.* लालूच दाखवणे

**Lurid** *adj.* १ पिंगट २ मलिन ३ भयानक

**Lurk** *v.i.* दडणे, दबा धरणे

**Lurking house trespass** *Law* प्रच्छन्न गृह अपप्रवेश (पु.)

**Luscious** *adj.* १ रसाळ २ अतिगोड ३ रसरशीत

**Lusciousness** *n.* १ रसाळपणा (पु.) २ अतिगोडपणा (पु.) ३ रसरशीतपणा (पु.)

**Lust** *n.* १ अभिलाषा (स्त्री.) २ (longing, desire) लालसा (स्त्री.) ३ (depraved desire) पापवासना (स्त्री.) ४ (carnal appetite) कामुकता (स्त्री.), कामतृष्णा (स्त्री.)
*v.i.* १ (to desire eagerly) लालसा धरणे २ (to have depraved desires) पापवासना असणे ३ (to have carnal desire) कामतृष्णा असणे

**Lustful** *adj.* कामासक्त

**Lustily** *adv.* दणकटपणे

**Lustre** *n.* द्युति (स्त्री.), तेज (न.)

**Lustreless** *adj.* निस्तेज

**Lustrous** *adj.* द्युतिमान, तेजस्वी

**Lusty** *adj.* दणकट

**Luxuriant** *adj.* भरघोस, विपुल

**Luxuries** *n. pl. Econ.* विलासवस्तू (स्त्री.अ.व.), चैनीच्या वस्तू (स्त्री.अ.व.)

**Luxurious** *adj.* विलासी, चैनी

**Luxuriously** *adv.* ऐषआरामाने, चैनीने

**Luxury** *n.* विलास (पु.), चैन (स्त्री.)

**Luxury bus** आराम गाडी (स्त्री.)

**Luxury tax** चैनीच्या वस्तूंवरील कर (पु.)

**Lying-in hospital** सूतिकागृह (न.)

**Lying in wait** पाळतीवर राहणे

**Lymph** *n. Med.* लसिका (स्त्री.)

**Lymphangitis** *n. Med.* लसिकावाहिनीदाह (पु.)

**Lymphatic** *adj.* लसिकावाहक

**Lymph gland** लसिका ग्रंथि (स्त्री.)

**Lyric** *n.* भावकाव्य (न.), भावगीत (न.)